# जिल्हा परिषद अहिल्यानगर
# महिला व बालविकास विभाग

## योजना


| अ.क्र. | योजनेचे नाव | पान क्रमांक |
|---|---|---|
| 1 | पोषण अभियान | 2 |
| 2 | पुरक पोषण आहार | 3 |
| 3 | भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना | 4 |
| 4 | पुर्व बाल्यावस्थेतील संगोपन व शिक्षण | 5 |
| 5 | ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) | 6 |
| 6 | एक रक्कमी लाभ योजना | 7 |
| 7 | बेबी केअर किट | 8 |
| 8 | आदर्श अंगणवाडी योजना | 9 |
| 9 | लेक लाडकी योजना | 10 |

# <u>पोषण अभियान</u>

## योजनेची उद्दीष्टे

शासनाने दि. ११/०७/२०१८ च्या शासन निर्णयान्वये पोषण अभियानाची अंमलबजावणी जिल्हयातील सर्व अंगणवाडी केंद्रामध्ये सुरु आहे. पोषण अभियान हा ०-६ वर्ष वयोगटातील बालके, गरोदर महिला आणि स्तनदा मातांसाठी पोषण परिणाम सुधारण्यासाठी देशातील सर्व राज्यांमध्ये सन २०१८ पासून अंमलबजावणी करण्यात येत आहे, हा कार्यक्रम किशोरवयीन मुली आणि गर्भवती स्त्रियांवर लक्ष केंद्रित करून लहान मुलांमधील वाढ, कुपोषण, अशक्तपणा आणि जन्मतः कमी वजन, या सर्व बाबी सुधारण्याकरिता तंत्रज्ञान, लक्षित दृष्टिकोन आणि अभिसरण पद्धतीचा वापर करण्यात येतो. विविध तंत्रज्ञानाचा वापर करून सेवा वितरण आणि हस्तक्षेप सुनिश्चित करणे, अभिसरणाद्वारे वर्तणुकीतील बदल करून विशिष्ट लक्ष्य साध्य करणे हे या कार्यक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

## लाभार्थी

१) १५-४९ वर्ष वयोगटातील महिला व किशोरवयीन मुलीं, गर्भवती महिला, स्तनदा माता

२) ० ते ६ वर्ष वयोगटातील बालके

पुन्हा अनुक्रमणिकेकडे जा

# पुरक पोषण आहार

## योजनेचे स्वरुप

केंद्र शासन पुरस्कृत एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत राज्यातील ग्रामीण / आदिवासी / नागरी प्रकल्पातील अंगणवाडी क्षेत्रातील 6 महिने ते 3 वर्षे वयोगटातील सर्वसाधारण व मध्यम श्रेणीतील बालकांना 500 उष्मांक व 12 ते 15 ग्रॅम प्रथिने युक्त THR अंतर्गत घरपोच आहार व गरोदर स्त्रीया, स्तनदा माता तसेच आकांक्षित जिल्हयातील 14 (+) ते 18 वर्षे वयोगटातील किशोरी मुलींना 600 उष्मांक व 18 ते 20 ग्रॅम प्रथिने युक्त THR अंतर्गत घरपोच आहार दिला जातो. 6 महिने ते 6 वर्षे वयोगटातील तीव्र कुपोषित बालकांना 800 उष्मांक व 20 ते 25 ग्रॅम प्रथिने युक्त आहार दिला जातो. 3 ते 6 वर्ष वयोगटातील बालकांना अंगणवाडी केंद्रात सकाळचा नाश्ता व दुपारचे जेवण (गरम ताजा आहार) महिला बचत गटा मार्फत देण्यात येतो.

## लाभार्थी

6 महिने ते 6 वर्षे वयोगटातील बालके, गरोदर व स्तनदा माता, आकांक्षित जिल्हयातील 14 (+) ते 18 वर्षे वयोगटातील किशोरी मुली.

## योजनेची उद्दीष्टे

१. बालके, किशोरी मुली, गरोदर व स्तनदा माता यांचा आहार विषयक दर्जा सुधारणे.

२. बालकांमधील कुपोषणाचे प्रमाण कमी करणे.

३. अति तीव्र कुपोषित बालकांना सर्वसाधारण श्रेणी मध्ये आणणे.

४. बालमृत्यूचे प्रमाण कमी करणे.

पुन्हा अनुक्रमणिकेकडे जा

# भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना

## योजनेचे स्वरुप

(शासन निर्णय क्र.आविवि-०५२३/प्र.क्र.१०४/का-०८, दिनांक १० जुलै २०२३). अन्वये भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना जिल्हयांतील ३ प्रकल्पातील ४१७ अंगणवाडयांमार्फत राबविण्यात येते. या योजनेंतर्गत या क्षेत्रातील गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांना दररोज रु. ४५/- या खर्च मर्यादेत एक वेळ चौरस आहार दिले जाते. तसेच ७ महिने ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना आठवडयातील ४ दिवस प्रत्येक लाभार्थीला रु. ६/- किंमतीच्या मर्यादेत केळी / अंडी देण्यात येते.

## योजनेची उद्दीष्टे

१) गरोदर व स्तनदा माता यांच्या आरोग्याची काळजी घेणे.

२) कमी वजनाची बालके जन्माला येण्याचे प्रमाण कमी करणे.

३) कुपोषणावर मात करणे, माता व बालमृत्यू रोखणे.

४) स्त्रियांमधील एनीमियाचे प्रमाण कमी करणे.

पुन्हा अनुक्रमणिकेकडे जा

# पुर्व बाल्यावस्थेतील संगोपन व शिक्षण

## योजनेचे वर्णन

जीवनाची पहिली सहा वर्षे महत्वाची असतात, कारण या वर्षांत शरीराच्या विकासाच्या दर इतर कोणत्याही टप्प्यापेक्षा अधिक वेगवान आहे. जागतिक मेंदू संशोधनाने देखील हे सिद्ध झाले आहे की सुरुवातीचे सहा वर्ष हे मेंदूच्या विकासासाठी महत्वाचे आहेत. पुर्व बाल्यावस्थेतील संगोपन व शिक्षण (ECCE) अंतर्गत पायाभूत टप्प्यांमध्ये बालकांना आनंदी आणि उद्दीपक वातावरण मिळाल्यास बालकांचा दीर्घकालीन विकास होतो आणि त्यामुळे बालकांच्या विकासाच्या प्रक्रियेत पुर्व बाल्यावस्थेतील संगोपन व शिक्षण (ECCE) चे महत्वाचे योगदान आहे.

## योजनेची उद्दीष्टे

बाल्यावस्था पूर्व संगोपन व शिक्षणाचा उद्देश बालकाच्या पूर्ण क्षमतेचा विकास करणे आणि सर्वांगीण विकास व आजीवन शिक्षणाचा पाया घालणे हे आहे.

बाल्यावस्था पूर्व संगोपन व शिक्षणाची व्यापक उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत:

1) प्रत्येक बालकांस आदर, सुरक्षा व सुरक्षितता तसेच बालकाच्या सकारात्मक स्वसंकल्पना विकसित करणे.

2) प्रत्येक मुलाच्या क्षमतेनुसार शारीरिक आणि सूक्ष्मस्नायूंचा विकास करणे.

3) उत्तम आहार व आरोग्याच्या सवयी, स्वच्छतेच्या सवयी आणि स्वावलंबी कौशल्ये रुजविणे.

4) बालकांना प्रभावी संवाद साधण्यासाठी सक्षम करणे.

5) पंचेंद्रियांचा विकासाला चालना देणे.

6) बौद्धिक विकास व वैज्ञानिक दृष्टिकोण विकसित करण्यासाठी संधी उपलब्ध करून देणे.

7) सामाजिक कौशल्ये, सामाजिक क्षमता आणि भावनिक विकास करणे.

8) सौंदर्यदृष्टी व सर्जनशीलतेचा विकास करणे.

9) घर ते अंगणवाडी केंद्र आणि अंगणवाडी केंद्रापासून ते औपचारिक शालेय शिक्षणापर्यंतचा प्रवास सहज व सुकर करणे .

10) सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास करणे.

पुन्हा अनुक्रमणिकेकडे जा

# ग्राम बाल विकास केंद्र (VCDC)

## वर्णन

अंगणवाडीत ० ते ६ वयोगटांतील सर्व बालकांची वजन, उंची, या निकषावर पडताळणी करण्यात येऊन त्यामध्ये तीव्र कुपोषित आढळून येणाऱ्या बालकांना ग्राम बाल विकास केंद्रात प्रवेश देण्यात येतो. प्रत्येक तीव्र कुपोषित बालक सर्वसाधारण पोषण श्रेणीत आणण्यांसाठी ग्राम बाल विकास केंद्रात सर्वकष प्रयत्न केले जातात.

## योजनेची उद्दीष्टे

१) बालकांच्या कुपोषणाच्या समस्येवर मात करण्यासाठी पूरक पोषण आहार देणे.

२) बालकांच्या कुपोषणाच्या समस्या दूर करण्यासाठी आरोग्य सेवा पुरवणे.

३) अति तीव्र कुपोषित बालकांचे कुपोषणापासून मुक्ती करणे

## योजनेचे स्वरुप

१) राज्यातील अती तीव्र कुपोषित (SAM) बालकांना कुपोषणातून बाहेर काढण्यासाठी ग्राम/अंगणवाडीस्तरावर ग्राम बाल विकास केंद्र सुरु करण्यात आलेले आहेत.

२) या अंतर्गत कुपोषित बालकांना एका महिन्याकरिता अंगणवाडीत दिवसभर ठेवण्यात येते.

३) अंगणवाडीत दररोज किमान ६ वेळा बालकांना पौष्टीक आहार देण्यात येतो.

४) याशिवाय अतिरिक्त आहाराच्या स्वरूपात अती तीव्र कुपोषित (SAM) बालकांना Energy Dense Nutritious Foods (EDNF) देण्यात येतो.

५) आठवड्यातून एकदा ए.एन.एम., १५ दिवसातून एकदा प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी हे ग्राम बाल विकास केंद्राला (VCDC) भेट देउन सर्व बालकांची आरोग्य तपासणी करण्यात येते.

पुन्हा अनुक्रमणिकेकडे जा

# एक रक्कमी लाभ योजना

## उद्दीष्टे

अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस या मानधनी कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती /राजीनामा /मृत्यु / सेवेतून काढून टाकल्यानंतर कल्याणकारी निधी म्हणून एकरकमी लाभ देणे.

## योजनेचे स्वरुप

एक रकमी लाभ देण्याबाबतची योजना शासन निर्णय दिनांक 30/04/2014 अन्वये सुरु करण्यात आली. मृत्यू /वयाच्या ६५ व्या वर्षी सेवानिवृत्त होणाऱ्या अंगणवाडी सेविका यांना रु. १,००,०००/- व अंगणवाडी मदतनीस /मिनी अंगणवाडी सेविका यांना ७५,०००/- रु एकरकमी लाभ दिला जातो. राजीनामा/ सेवासमाप्ती होणाऱ्या अंगणवाडी सेविका/ मदतनीस/मिनी अंगणवाडी सेविका यांना त्यांचे शेवटचे मानधन x एकूण सेवा (वर्षांमध्ये) इतकी रक्कम तथा अंगणवाडी सेविका यांना जास्तीत जास्त रु. १०००००/- व अंगणवाडी मदतनीस यांना जास्तीत जास्त रु. ७५,००००/- एकरकमी लाभ म्हणून दिला जातो.

पुन्हा अनुक्रमणिकेकडे जा

# बेबी केअर किट

## लाभार्थी

अंगणवाडी केंद्रात नोंदणी केलेल्या व महाराष्ट्र राज्यातील शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्र/ शासकीय रुग्णालयात गरोदरपणी नाव नोंदणी केलेल्या व त्याठिकाणी प्रसुती होण्या-या महिलांना पहिल्या प्रसुतीच्यावेळी त्यांच्या नवजात बालकांकरिता (मुलगा किंवा मुलगी) हि योजना कार्यरत आहे.

## वर्णन

राज्य शासनाच्या दिलेल्या मान्यतेनुसार बेबी केअर किट योजना लागू करण्यात आली, त्यानुसार महाराष्ट्र राज्यात शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्र/ शासकीय रुग्णालयात गरोदरपणी नाव नोंदणी केलेल्या व त्याठिकाणी प्रसुती होणाऱ्या नवजात बालकांना पहिल्या प्रसुतीच्या वेळी मुलगा किंवा मुलगी जन्मल्यानंतर त्यांना मोफत शासनातर्फे रुपये २०००/- इतक्या रक्कमेपर्यंत बेबी केअर कीट बॅग उपलब्ध करुन देण्यात येते.

## योजनेची उद्दीष्टे

१) शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्र/शासकीय रुग्णालयामध्ये प्रसूती करण्यास प्रोत्साहन देणे.
२) बाल मृत्यू दर कमी करणे.
३) गरोदर माता व नवजात शिशुच्या आरोग्याची काळजी घेणे.

पुन्हा अनुक्रमणिकेकडे जा

# आदर्श अंगणवाडी योजना

## योजनेचे उद्दीष्टे

१) अंगणवाडयांचा दर्जा सुधारून व त्यांच्या पायाभूत सोयी -सुविधांमध्ये वाढ करुन त्यांचे आदर्श अंगणवाडीमध्ये रुपांतरीत करणे.
२) अंगणवाडी केंद्राचे शिक्षण व परिसर आनंददायी करणे.

## योजनेचे स्वरुप

१) अंगणवाडयांचा दर्जा सुधारुन व त्यांच्या पायाभूत योयी-सुविधांमध्ये वाढ करुन त्यांना आदर्श अंगणवाडीमध्ये रुपांतरीत करणेसाठी अंगणवाडीत सौर उर्जा संच, अंगणवाडी इमारतीसाठी शैक्षणिक साहित्य,ई-लर्निंग, पायाभूत सुविधा- LED TV with USB port and Pendrive बालकांसाठी खुर्च्या व टेबल, बालकांसाठी स्वच्छ भारत संच, वॉटर प्युरिफायर (वीज विरहीत), इमारतची बाहय रंगरंगोटी, सुशोभिकरण, शौचालय दुरस्ती, परिसर स्वच्छता, किरकोळ दुरस्ती इ., बाबींचा समावेश आहे.
२) सन २०१८-१९ पासून आदर्श अंगणवाडी योजना सुरु करण्यात आली आहे. स्वमालकीच्या इमारतीमधील अंगणवाडयांचे आदर्श अंगणवाडीत रुपांतर करण्यात येत आहे.

पुन्हा अनुक्रमणिकेकडे जा

# <u>लेक लाडकी योजना</u>

## वर्णन

माझी कन्या भाग्यश्री (सुधारीत) ही योजना अधिक्रमित करुन राज्यात दिनांक १ एप्रिल २०२३ पासून मुलींच्या जन्मानंतरच्या सक्षमीकरणासाठी "**लेक लाडकी**" योजना सुरु करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. ही योजना पिवळया किंवा केशरी धारक कुटुंबामध्ये दि. १ एप्रिल २०२३ रोजी जन्मलेल्या मुलीकरीता लागू आहे. तसेच लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम रु. १ लाखापेक्षा अधिक नसावे.

## योजनेची उद्दिष्टये

१. मुलीच्या जन्मास प्रोत्साहन देवून मुलींचा जन्मदर वाढविणे.

२. मुलींच्या शिक्षणास चालना देणे.

३. मुलींचा मृत्यू दर कमी करणे व बालविवाह रोखणे.

४. कुपोषण कमी करणे,

५. शाळाबाहृय मुलींचे प्रमाण ० (शुन्य) वर आणण्यासाठी प्रोत्साहित करणे.

## योजनेचे स्वरुप

"**लेक लाडकी**" योजनेअंतर्गत पिवळ्या व केशरी शिधापत्रिकाधारक कुटुंबात मुलींच्या जन्मानंतर ५ हजार रुपये, इयत्ता पहिलीत ६ हजार रुपये, सहावीत ७ हजार रुपये, अकरावीत ८ हजार रुपये तर लाभार्थी मुलींचे वय १८ वर्ष पूर्ण झाल्यानंतर तिला ७५ हजार रुपये याप्रमाणे एकूण रुपये १,०१,०००/- एवढी रक्कम देण्यात येईल.

## निकष/ कार्यपणाली

१) ही योजना पिवळ्या व केशरी शिधापत्रिकाधारक कुटुंबामध्ये दिनांक १ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यानंतर जन्माला येणा-या एक अथवा दोन मुलींना लागू राहील. तसेच, एक मुलगा व एक मुलगी असल्यास मुलीला लागू राहील.

२) पहिल्या अपत्याच्या तिस-या हप्त्यासाठी व दुस-या अपत्याच्या दुस-या हप्त्यासाठी अर्ज सादर करतेवेळी माता/पित्याने कुटुंब नियोजन प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

३) तसेच, दुसऱ्या प्रसुतीच्या वेळी जुळी अपत्ये जन्माला आल्यास एक मुलगी किंवा दोन्ही मुलींना या योजनेचा 3 लाभ अनुज्ञेय राहील. मात्र त्यानंतर माता / पित्याने कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणे आवश्यक राहील.

४) दिनांक १ एप्रिल, २०२३ पूर्वी एक मुलगी / मुलगा आहे व त्यानंतर जन्माला आलेल्या दुसऱ्या मुलीस किंवा जुळ्या मुलींना (स्वतंत्र) ही योजना अनुज्ञेय राहील. मात्र माता / पित्याने कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणे आवश्यक राहील.

५) लाभार्थीचे कुटुंब महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी असणे आवश्यक राहील.

६) लाभार्थी बँक खाते महाराष्ट्र राज्यात असणे आवश्यक आहे.

७) लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम रु. १ लक्ष पेक्षा जास्त नसावे.

पुन्हा अनुक्रमणिकेकडे जा